विघ्नसंतोषी

आपल्या आजूबाजूला अशा काही व्यक्ती असतात की ज्यांना कधीतरी, कुठेतरी काही अपशब्द अथवा गरज नसलेला विषय काढणे अथवा एखाद्याला काही टाकून बोलणे किंवा चालू विषयातील अथवा प्रसंगातील मजा घालवून त्याचा विचका करणे व सगळा बेरंग करणे हे केल्याशिवाय चैन पडत नाही.

अशी माणसे दुसऱ्याचे सुख बघू शकत नाहीत, किंवा काहीतरी करून आपले अस्तित्व उगाच गडद करायचा प्रयत्न करतात किंवा लक्ष वेधून घ्यायचा केविलवाणा प्रयत्न करतात.

आपल्या मित्र/ मैत्रिणींमध्ये, सोशल मीडिया ग्रुप अथवा घरात अथवा इतर समूहात अशी एखादी व्यक्ती असतेच, एखाद्या छान नितळ जलाशयात जसा एखादा दगड पडला की जसा, उगाच तरंग निर्माण करतो, आवाज करून शांतता भंग करून गाळ ढवळून वर आणतो, पण अशा व्यक्तीच्या लक्षात येत नाही, कालांतराने त्याने निर्माण केलेला गाळ त्याच्यावरच साचणार आहे, व तो दगड जसा आपण वर आणलेल्या गाळात झाकला जातो व एकप्रकारे दुर्लक्षित होतो तशीच त्यांची अवस्था होणार आहे, मग तो जलाशय काय किंवा त्यांचा इतर परिवार, मैत्र समूह काय ते आहे तसे पुनर्वत चान राहणारच आहेत.

मग अस काहीतरी अनावश्यक विधान करून अथवा विषय काढून असे विरस करणारे लोक तोंडावर ताबा न राहिल्याने बाजूला फेकले जातात, दुर्लक्षित केले जातात, पण बऱ्याच वेळा हे कळूनही त्यांना आपला स्वभाव बदलता येत नाही, हे त्यांच्या स्वतःवर नसलेल्या संयमाची कमतरता व माणूस धार्जिण नसल्याचे फलित आहे...

© सपु
www.saarthbodh.com